For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com
Downloaded from SkillCouncils.com

# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## महिला व बालकल्याण विभाग

## अटी व शर्ती

**कामाचे नाव :-** कुळगांव बदलापुर नगरपरीषद हदिदत ब्युटीपार्लर विषयाचे प्रशिक्षण देणे करीता.

1. प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य, फर्निचर, विदयुत व्यवस्था व प्रशिक्षणाकरिता जागा उपलब्ध करणेची जबाबदारी संस्थेची राहील.

2 प्रशिक्षण देणेकामी प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करणेची जबाबदारी संस्थेची राहील.

3. प्रशिक्षणार्थीस वर्गामध्ये 80% उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यास परिक्षेस बसण्यात पात्र असतील.

4. प्रशिक्षणार्थीस 3 महिने (120 तास) मुदतीचे पशिक्षण देण्यात येईल. तसेच प्रत्येक दिवशी किमान 2 तास प्रशिक्षण देणे बंधनकारक राहिल.

5. प्रशिक्षणासाठी नेमणुक केलेले शिक्षक गव्हर्नमेन्ट रेकग्नाईज्ड प्रमाणपत्र प्राप्त केलेले असतील.

6. प्रशिक्षण कोर्स प्रशिक्षणार्थीना VTP संस्थेकडून देण्याची जबाबदारी संस्थेची राहिल, व नेमणुक केलेल्या शिक्षकांचे शैक्षणिक अर्हता बाबतचे कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असेल.

7. प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यावर देयक सादर करण्यात येईल. त्यामध्ये आयकर व इतर शासकीय वजाती कपात करण्यात येईल, व त्याबाबत माझी काहीही हरकत नाही.

8. प्रशिक्षणाची पुर्तता वेळेत न पूर्ण झाल्यास होणा-या गैरसोयीबाबत आपण केलेल्या कारवाईस मी बांधिल राहिल.

9 निविदेतील अर्जात दिलेल्या अंदाजित प्रशिक्षणार्थीपैंकी नगरपरिषदेने दिलेल्या आदेशानुसार प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण देण्यात यावे.

10. कु.ब.न.प. मधील प्रभागातील प्रशिक्षणा करिता लाभार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

11. प्रशिक्षणार्थी यांची यादी करताना प्रथम येणा-यास प्राधान्यप्रमाणे कागदपत्रे आवश्यक अर्ज ग्राहय धरले जाईल.

12. प्रशिक्षणार्थी अर्ज भरताना त्यासोबत शाळेचा दाखला, वास्तव्याचा पुरावा (रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, घरपट्टी पावती तत्सम.) प्रती अर्जासोबत फोटो आवश्यक राहिल.

13. प्रशिक्षणार्थीने जोडलेले कागदपत्रे खोटे निघाल्यास त्याबाबत आमच्या संस्थेला दंडात्मक कारवाई करण्यास आमची कूठल्याही प्रकारे हरकत नूसन त्याबद्दल येणा-या दंडात्मक रक्कमेस नुकसान भरपाई देण्यास तयार आहोत. आमची संस्था बांधिल राहिल.

14. निविदा अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

15. नगरपरिषदे मध्ये जस जसा निधी उपलब्ध होईल तस तसे देयके अदा करण्यात येईल.

16. निविदेतील दराबाबत नगरपरिषदेच्या शासकीय लेखा परिक्षणात काही वसुलीव ऑडीट आक्षेप निघाल्यास ती रक्कम मंजुर ठेकेदार यांचेवर रोखीने भरणे बंधनकारक राहील. अन्यथा सुरक्षा अनामत रक्कमेमधून कपात करण्यात येईल. वा इतर नियमानुसार वसुल करण्यात येईल. संबंधित देयकांचे संपुर्ण लेखापरिक्षण झाल्यानंतर सुरक्षा अनामत अदा करण्यात येईल.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com
Downloaded from SkillCouncils.com

17. प्रस्तावित करण्याव्यतिरिक्त कोणतीही रक्कम वाढवून मिळणार नाही.

18. लाभार्थी यांची प्रशिक्षण यशस्वी पूर्ण केले व प्रमाणपत्र दिल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.

19. सदर प्रशिक्षणास शासनाकडून अनुदान मिळालेले नाही, यांचे प्रमाणपत्र सादर करणे संस्थेस बंधनकारक राहिल.

20. करारनाम्याची अंमलबजावणी कार्य आदेशापासून 45 दिवसाच्या आत सुरु करणे आवश्यक आहे.

21. संस्थेकडे शासकीय येणे नाही, याची हमी दिली पाहिजे.

22. लाभार्थ्यांना सर्व स्तरातील लोकांचा विचार करण्यात यावा, त्यामध्ये अनुसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांचे अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच नगरपरिषदेकडील पूरविण्यात आलेली यादी ला प्राधान्य दिले जाईल.

23. जिल्हा कौशल्य केंद्र विकास येथे सदर उमेदवार यांना नोंदणी साठी मार्गदर्शन करण्यात येईल.

24. निविदा अटी व शर्ती आम्हांस ज्ञात आहोत. त्यांचे उल्लंघन होणार नाही. व झाल्यास त्यापासून होणा-या परिणांमास आम्ही जबाबदार असू.

25. सदर कामाचा करारनामा मध्ये वेळोवेळी शासनाकडून मिळणारे मार्गदर्शक सुचना, निर्देश/आदेश नुसार बदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी (कुबनप) यांना असतील. तसेच प्रशासकीय कारणास्तव सदरचा करारनामा मध्ये बदल तसेच रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. त्याबाबत संस्थेला कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. याबाबत कोणतेही मा.न्यायालयात सदर बाबत तक्रार किंवा दावा दाखल करता येणार नाही.

26. सदरचा कामात संस्थे विरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास त्या बाबत चौकशी अटी व शर्ती योग्य ती कारवाई संस्थे विरुध्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना असतील.

27. सदर काम विभाग प्रमुख महिला व बालकल्याण विभाग, कुबनप यांचे संपूर्ण नियत्रंण राहिल.

28. सदरील प्रशिक्षणा करीता खंर्चाची कमाल मर्यादा रक्कम रु. 5 लक्ष इतकी असेल.

**1. एकूण सुरक्षा अनामत रक्कम १० % कपात करण्यात येईल. त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे :-**

**१) निविदा फॉर्म भरतेवेळी १ %**

**२) निविदा दर स्वीकृती/ कार्यादेश देताना २%**

**३) उर्वरित ७ % देयक अदा करते वेळी**

**2. दरपत्रक करार :**

दरपत्रक धारकांने त्यास करारपत्र मिळाल्यावर मुदतीत करारनामा नुसार काम करण्यास टाळल्यास नगरपालिका त्यांच्या विरुध्द दरपत्रकेतील अटी व शर्तीचे पालन करण्यास कसुर केली म्हणून कारवाई करण्याचा हक्क व स्विकृतीपत्र रद्द करण्याचा हक्क राखुन ठेवला आहे. दरपत्रक स्विकृती रद्द केल्यावर कंत्राटदारास कोणतेही नुकसान भरपाईची रक्कम देणे नगरपालिका बंधनकारक असणार नाही. तसेच नगरपालिका वरील प्रमाणे कारवाई केल्यावर दरपत्रक धारकांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com
Dowmloaded from SkillCouncils.com

3 . करारनामा रद्द करण्याबाबत सूचना :

1. सदर प्रशिक्षणाचे आयोजन न केल्यास किंवा अर्धवट स्थितीत सोडून दिले आहे. दरपत्रक धारकांस 15 दिवसांची नोटीस देवुन करारनामा रद्द करणेची मुभा नगरपालिकेची राहिल, व दरपत्रक धारकांची सुरक्षा अनामत जप्त करण्यात येइल.
2. नगरपालिका व दरपत्रक धारक यांच्यात करारनाम्यातील अटी व शर्तीवरुन किंवा त्यामधील वाक्याचा अर्थ लावण्यावरुन मतभिन्नता झाल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास मा.मुख्याधिकारी,कुबनप यांनी दिलेला निर्णय हा दोन्ही पक्षावर बंधंनकारक राहील.

3. उपरोक्त कामाचा करारनामा मधील अटी व शर्ती मध्ये वित्तीय तसेच प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदल करण्याचे अधिकार मा.मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवले आहे.

4. लेखा परिक्षामध्ये वसुलीपत्र रक्कम निघालेस ती रक्कम भरणेची जबाबदारी आपणांवर राहील. त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही, तसेच आलेल्या दरपत्रकपैंकी एक अगर सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता अंशत पूर्णत: नाकारणेचा अगर स्विकारणेचा अधिकार न.पा. ने राखुन ठेवलेला आहे.
5. काही कारणास्तव कोणत्याही एकाच ठेकेदारांची दरपत्रक होत असेल, तर त्या ठेकेदारला काम देण्याचे पूर्ण अधिकार मुख्याधिकारी यांना असतील. त्या बाबत काणतेही कारण अथवा लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही.
6. सदरच्या कामाची आवश्यक ती माहिती महिला बालकल्याण विभागाकडे कार्यालयीन वेळेत सुट्टीने दिवस सोडून पहावयास मिळेल. वरीलच्या सर्व कामासाठी ठेकेदारास कोणती ही अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव.